**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२७४**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : २५.०४.२०२३

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या २७४व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

संवशिरसाट 25/4/2023

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२. - **अध्यक्ष**

श्री. जयंत कुमार बांठिया
समर्थ अंगण, बिल्डींग-३A,
पु.ल.देशपांडे रोड, मिल्लत नगर,
अंधेरी –पश्चिम,
मुंबई – ४०० ०५३ - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१. - सदस्य

महानगर आयुक्त
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण - सदस्य

प्रशासक
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई – ४०० ००१. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२. - सदस्य

व्यवस्थापकीय संचालक, - **सदस्य**
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव, (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*****

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २७४व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **१० एप्रिल, २०२३ (सोमवार)** |
| **वेळ** | : | **दुपारी ०२.०० वाजता** |
| **स्थळ** | : | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>६वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई — ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य:**

| | | |
|---|---|---|
| श्री. मनु कुमार श्रीवास्तव<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठिया | - | सदस्य |
| श्री. भूषण गगराणी<br>अपर मुख्य सचिव (१)<br>नगर विकास विभाग<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री. एस. व्हि.आर. श्रीनिवास<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| श्रीमती वल्सा नायर सिंग<br>अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन | - | सदस्य |

**निमंत्रित:**

श्रीमती शैला ए.<br>सचिव (वित्तीय सुधारणा),<br>वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

डॉ. के.एच.गोविंद राज<br>अतिरिक्त महानगर आयुक्त (१)<br>मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. दिलीप कुमार सिन्हा<br>संचालक (प्रणाली),<br>मेट्रो अंमलबजावणी शाखा,<br>मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. अंकुश नवले
वित्तीय सल्लागार
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. डी.एल.एन.मुर्ती,
प्रमुख,
परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. चंदन शिरसाट
सचिव, कार्यकारी समिती

उपरोक्त नमूद कार्यकारी समितीची २७४वी बैठक शासनाच्या दिनांक ०६ एप्रिल, २०२३ रोजीच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आली होती.

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत व अभिनंदन केले.

श्री. अजित वर्टी, माजी महानगर आयुक्त यांचे दिनांक ०३ मार्च, २०२३ रोजी दु:खद निधन झाले. तसेच श्री. शरद काळे, माजी महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, यांचे दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी दु:खद निधन झाले. श्री अजित वर्टी हे दिनांक १४ जून, १९९९ ते १६ जानेवारी, २००३ ह्या कालावधीत महानगर आयुक्त तसेच दिनांक १५ फेब्रुवारी, १९९४ ते ३० सप्टेंबर, १९९६ या कालावधीत प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग या नात्याने कार्यकारी समितीचे सदस्य होते. तसेच श्री. शरद काळे हे दिनांक १६ नोव्हेंबर, १९९१ ते १६ मे, १९९५ ह्या कालावधीत महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका या नात्याने कार्यकारी समितीचे सदस्य होते. त्यांच्या निधनाबाबत एक मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली व त्यांच्या दु:खद निधनाबाबत ठराव मंजूर करण्यात आला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या २७३व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या २७३व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र. ३: मुंबई मेट्रो मार्ग-१ वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर कॉरिडोर – प्राधिकरणाच्या दिनांक १० मार्च, २०२३ रोजी झालेल्या १५४व्या बैठकीमधील निर्णयानुसार सादर.**

३.१ प्राधिकरणाच्या दिनांक १० मार्च, २०२३ रोजी झालेल्या बैठकीमधील निर्देशानुसार सदर विषय कार्यकारी समितीच्या बैठकीत सादर केला आहे.

३.२ उपरोक्त प्रस्तावाबद्दल माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे प्रस्तावित केले की, मेट्रो मार्ग -१ वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर ह्या मार्गाचे काम दिनांक ७ मार्च, २००७ रोजी मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर (७४ % भागीदारी) यांना प्रदान करण्यात आले आणि सवलत करारनामा सांक्षाकित करण्यात आला. मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर प्रकल्पाचा एकूण खर्च रु. २,३५६ कोटी हा व्यवहार्य तफावत निधी (VGF) रु.६५० कोटी रक्कमेस समाविष्ट करुन आहे. मे.मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) यांची SPV विशेष उद्दिष्ट वाहन म्हणून (प्राधिकरणाचे २६% योगदान अंतर्भूत करुन) स्थापन केले आणि सदर प्रकल्प दिनांक ८ जून, २०१४ रोजी प्रवासी वाहतुकीकरिता खुला करण्यात आला आहे.

३.३ मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) यांनी त्यांच्या दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्राधिकरणाला सवलत कराराच्या काही मुद्द्यांमध्ये सुधारणा करण्याची विनंती केल्याची कार्यकारी समितीने नोंद घेतली. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कायदेशीर बाबींच्या संदर्भात महानगर आयुक्त यांनी सांगितले कि, मेट्रो मार्ग-१ हा प्रथमतः भारतीय ट्रामवे कायदा, १८८६ कायद्यांतर्गत घेतला आणि सवलत कराराची अंमलबजावणीसुद्धा भारतीय ट्रामवे कायदा , १८८६ प्रमाणे करण्यात आली होती. तद्नंतर, दिनांक १६ ऑक्टोबर २००९ च्या भारत सरकारच्या अधिसुचनेनुसार मेट्रो कायदा २००२ मध्ये अंमलात आला व त्यातील अधिनियमानुसार, मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) मेट्रो रेल्वे प्रशासक म्हणून काम करण्याचे अधिकार दिले. माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये राज्य सरकारने भारत सरकारला वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर कॉरिडोरला लागू करण्यात आलेला मेट्रो कायदा २००२ रद्द करून, भारतीय ट्रामवे कायदा ,१८८६ च्या तरतुदी सदर प्रकल्पासाठी लागू करण्याची शक्यता तपासावी असा विनंती अर्ज केला होता.

३.४ कार्यकारी समितीने, प्राधिकरण (MMRDA) आणि मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) यांच्यामधील न सुटलेल्या खालील मुद्द्यांची नोंद घेतली,

१. मेट्रो मार्ग-१ च्या संदर्भात पाच स्वतंत्र लवाद कार्यवाही सुरू असून त्यापैकी ३ लवाद हे पूर्ण झाले आहेत. दोन लवादांवर कार्यवाही अजून सुरु झालेली नाहीत.

प्रवासी भाडे संरचनेबाबत काही दावे न्यायालयात प्रलंबित आहेत. महानगर आयुक्त यांनी सांगितले कि, लवाद कार्यवाहीमध्ये प्रकल्पाची किंमत आणि प्रवासी भाडे संरचना समाविष्ट करण्यात आले आहे. तसेच, सवलतदाराने सवलत करारामध्ये मान्य केलेल्या तरतुदींनुसार प्रकल्प राबविणे आणि चालवणे आवश्यक होते. त्याप्रमाणे प्राधिकरणाने लवाद न्यायाधिकरणासमोर सवलत करारनामा कलमांचे पालन करण्याची भूमिका घेतली आहे.

२. प्राधिकरण आणि नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याद्वारे पाठपुरावा करून सुद्धा मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) यांनी त्यांच्या लेखांचे मुख्य महालेखापरीक्षक मार्फत लेखापरीक्षण करण्यास जोरदार विरोध केला आहे.

३. मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) यांनी आगाराच्या ३०,१८७ चौ.मी. क्षेत्राफळामध्ये आणि १०,६७० चौ.मी.चे क्षेत्रफळाचे १२ मेट्रो स्थानकामध्ये अतिरिक्त बांधकाम केले आहे आणि प्राधिकरणाने मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) यांना अतिरिक्त बांधकाम क्षेत्र प्राधिकरणास हस्तांतरित करण्यास सांगितले आहे.

३.५ कार्यकारी समितीने नोंद घेतली कि, मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांनी दिनांक १३ जुलै २०२० रोजीच्या पत्रांन्वये मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) या संस्थेतील ७४ टक्के भाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अधिग्रहित करण्यासाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास पाठविला. दिनांक ३० एप्रिल २०२० रोजी पार पडलेल्या कार्यकारी समितीच्या २६५ व्या बैठकीत पारित झालेल्या ठरावानुसार मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) संस्थेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावास अनुसरून मेट्रो मार्ग-१ संचलन आणि देखभालीसाठी महानगर आयुक्त यांना निर्णय घेण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले. यास अनुसरून 'Strategic Acquisition of Metro Line 1 VAG corridor' या कामासाठी मे. कॅपिटल फॉर्च्यून प्रायव्हेट लिमिटेड, यांची नियुक्ती केली असून सध्या कार्यरत आहेत.

३.६ महानगर आयुक्त यांनी सांगितले कि, मूल्यांकन कार्य चालू असताना ,मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) यांनी खालीलप्रमाणे दोन पत्रे पाठवली ;

**पत्र क्र.१** दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या मूल्यांकनामध्ये पुढील ३ मुद्दे समाविष्ट करण्याची विनंती केली आहे : १) मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) यांच्या ताब्यात असलेल्या आगाराची जागा २) स्थानकांवर उपलब्ध असलेल्या रिकाम्या किरकोळ व्यावसायिक क्षेत्र ३) खांब, मार्गिका, स्थानकबाह्य भागआणि पूल इत्यादीं वरील जाहिराती.

**पत्र क्र.२** दिनांक ९ जानेवारी २०२३ च्या पत्राद्वारे प्राधिकरणाला, मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) यांनी सवलत करारनाम्यामधील सहा मुद्यांशी संबंधित कलमांमध्ये सुधारणा करण्याची विनंती केली, जसे की, (१) प्रकल्पाची किंमत, (२) प्रवास भाडे संरचना, (३) सवलतीच्या कालावधीची मुदतवाढ आणि पत्र क्र. १ मधील ३ मुद्दे.

महानगर आयुक्त यांनी सांगितले कि, सवलत करारनाम्यामधील सहा मुद्यांशी संबंधित मागितलेल्या प्रत्येक सुधारणेसाठी मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. (MMOPL) यांनी स्वतःचा आधार दिला आहे. उपरोक्त पत्र क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, ६ मुद्यांपैकी, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी प्रकल्पाच्या मूल्यांकनातील ३ मुद्यांचा विचार करण्यासाठी प्राधिकरणाला आधीच निर्देश दिले आहेत.

३.७ या विषयावर अतिशय सविस्तर चर्चा करण्यात आली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४५१ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

> " प्राधिकरणाकडे मेट्रो मार्ग -१ या प्रकल्पाचा ताबा घेण्यासाठी, मे.रिलायन्स इन्फ्रास्टक्चर लिमिटेड यांनी केलेली विनंती, सवलत कराराशी संबंधित उपस्थित करण्यात आलेले विविध मुद्दे व लवादा समोरील दावे यांचा सखोल अभ्यास करुन यासंदर्भात घ्यावयाच्या भूमिकेविषयी प्राधिकरणास शिफारस करण्यासाठी महानगर आयुक्त MMRDA यांनी एक स्वतंत्र अभ्यासगटाची स्थापना करावी. सदर अभ्यासगट एका सेवानिवृत्त भा.प्र.से अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली स्थापन करता येईल. सदर अभ्यासगटाचा अहवाल प्राधिकरणास प्राप्त झाल्यावर त्याची तपासणी करुन त्या आधारे योग्य तो प्रस्ताव कार्यकारी समितीमार्फत प्राधिकरणापुढे सादर करण्यात यावा."

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ४ : मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या मेट्रो मार्ग २ब मार्गिकेवरील मंडाले डेपोचे विद्युत आणि यांत्रिक (E&M) या कामाकरीता मे. जॅक्सन लिमिटेड यांच्या लघुत्तम देकाराला मान्यता मिळणेबाबत.**

४.१ उपरोक्त प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या मेट्रो मार्ग २ब च्या (डी.एन.नगर ते मंडाळे) मंडाळे डेपोसाठी विद्युत व यांत्रिक (E&M), आग शोधणे व अग्निशमन यंत्रणा, डिझेल जेनेरेटर यंत्र, कॉम्प्रेसर व ई. ओ. टी. क्रेन्स इत्यादी कामाचे आराखडा पडताळणी, पुरवठा, बसवणे व चाचणी आणि कमिशनिंग कामे करणे. या कामाकरिता रुपये ५९.७ कोटीचे (कर वगळता) अंदाजपत्रक सामान्य सल्लागाराने तयार केले आहे आणि प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्याने मंजूर केलेले आहे.

एकेरी निविदा, दोन लिफाफा पद्धतीनुसार आंतरराष्ट्रीय बोली नियमांच्या आधारावर वरील कामांसाठी खुल्या निविदा आमंत्रित करण्यात आल्या. महा- टेंडर पोर्टलच्या ई-निविदा संकेतस्थळावर दिनांक ०१.११.२०२२ रोजी जारी करण्यात आल्या. दिनांक १३.०१.२०२२ रोजी. दुपारी १२.०१ वाजता ई- निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष लिफाफा 'अ'(निविदा इसारा किंमत) उघडण्यात आला. निविदा प्रक्रियेमध्ये खालील (दोन) निविदाकारांनी भाग घेतल्याचे आढळले.

१. मेसर्स अहलुवालीया कॉट्रॅक्टस इंडिया लिमिटेड.

२.मेसर्स जॅक्सन लिमिटेड.

खाली उल्लेख केलेल्या ई- निविदांची तांत्रिक छाननी, प्रकल्पाच्या सामान्य सल्लागारामार्फत करण्यात आली.

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव |
|---|---|
| १. | मेसर्स अहलुवालीया कॉट्रॅक्टस इंडियालिमिटेड |
| २. | मेसर्स जॅक्सन लिमिटेड. |

उपरोक्त नमूद २ पैकी दोन्ही निविदाकारांच्या तांत्रिक निविदा ह्या सक्षम प्राधिकारी व निविदा समितीने शिफारस केल्यानुसार व सामान्य सल्लागारांनी दिलेल्या अहवालानुसार सकारात्मक प्रतिसादाच्या असल्याचे निदर्शनास आले. सक्षम अधिकाऱ्यांनी तांत्रिकदृष्टया सक्षम असलेल्या २ (दोन) निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा ब-आर्थिक प्रस्ताव) दिनांक ०६.०३.२०२३ रोजी उघडण्यात आले व आर्थिक छाननीसाठी सामान्य सल्लागाराकडे दिनांक ०६.०३.२०२३ पाठविण्यात आले. सामान्य सल्लागाराने आर्थिक छाननी करुन त्यांचा अहवाल दिनांक ०९.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केला.

निविदांचा तुलनात्मक आर्थिक छाननीचा अहवाल

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | निविदाकारांचा देकार (Tender's quoted in INR) | % अंदाजपत्रकीय किंमतीच्या अधिक/ कमी(Above/ Below w.r.t. Estimate) | स्थिती (Position) |
|---|---|---|---|---|
| १. | मेसर्स अहलुवालीया कॉर्ट्रॅक्टस इंडिया लिमिटेड. | ८६,५६,१७,५२५.९६ | ४५ % अधिक | L-२ |
| २. | **मेसर्स जॅक्सन लिमिटेड.** | **६३,३८,११,१२२.२९** | **६.१७** % अधिक | **L-१** |

यानंतर पॅकेज सीए-६६ मध्ये मेसर्स जॅक्सन लिमिटेड. यांचा रु. ६३,३८,११,१२२.२९/- सर्व कर वगळून रक्कमेचा लघुत्तम देकार (अंदाजपत्रकीय रु. ५९,६९,७७,६०४.११/- किंमती पेक्षा ६.१७% जास्त दराचा) आहे. दिनांक १५ मार्च, २१ मार्च आणि २९ मार्च, २०२३ रोजी लघुत्तम देकार बोलीदाराच्या आर्थिक ऑफरवर विचार करण्यासाठी निविदा शिफारस समितीच्या बैठकी झाल्या.

४.२ चर्चे दरम्यान असे नमूद केले की, निविदा शिफारस समितीने किंमत कमी करण्यासाठी वाटाघाटीची एक फेरी पार पाडली परंतू मेसर्स जॅक्सन लिमिटेडने त्यांच्या दिनांक २२.०३.२०२३ च्या पत्राद्वारे किंमत कमी करण्यास असमर्थता व्यक्त केली. त्यांनी याबाबत असे स्पष्टीकरण दिले की, बाजारातील स्पर्धात्मक वातावरण आणि कामाचे प्रमाण यामुळे त्यांच्याकडून उद्धृत केलेले दर वाजवी आणि व्यवहार्य आहेत. सामान्य सल्लागाराने मेसर्स जॅक्सन लिमिटेडचे दर विश्लेषण केले आणि त्यांना असे आढळले की, मुख्यत्वे दरांचे फरक EOT क्रेन्स आणि केबलमुळे आहेत. या वस्तुंचे दर अंदाजपत्रकामध्ये मेट्रो मार्गिका २अ वरआधारित होते (०४ वर्षाच्या कालावधीसाठी २०% वाढीसह). बाजारमुल्य सत्यापित करण्यासाठी सामान्य सल्लागाराकडून मेसर्स डिमॅग (Demag) आणि मेसर्स केईआय (KEI) कडून कोटेशन मागविण्यात आले. मेसर्स डिमॅग (Demag) यांनी EOT क्रेनसाठी रु. १७ कोटी दर उद्धृत केला आणि यासाठी मेसर्स जॅक्सन लिमिटेडने रु. १२.४५ कोटी दर उद्धृत केले आहेत. केबलचे दर मेसर्स केईआय (KEI) ने रू.४.१० कोटी उद्धृत केले आहे. त्यासाठी मेसर्स जॅक्सन लिमिटेडने रु. ४.५१ कोटी दर उद्धृत केले आहे. सामान्य सल्लागाराने निष्कर्ष काढला की, मेसर्स जॅक्सन लिमिटेडने दिलेले दर वाजवी आहेत. विचार-विनिमय केल्यानंतर, निविदा शिफारस समितीने मेसर्स जॅक्सन लिमिटेड यांची लघुत्तम देकार ऑफर व्यवहार्य, वाजवी आहे आणि स्वीकारण्यासाठी शिफारस केली आहे.

..८/-

४.३ उपरोक्त नमूद वस्तुस्थिती विचारात घेऊन, कार्यकारी समितीने मेसर्स जॅक्सन लिमिटेड यांनी सादर केलेली लघुत्तम दराची रक्कम रुपये ६३,३८,११,१२२.२९ (अक्षरी रुपये त्रेसष्ठ कोटी अडतीस लाख अकरा हजार एकशेबावीस आणि एकोणतीस पैसे मात्र) एवढ्या किंमतीची निविदा, जी अंदाजित किंमतीच्या ६.१७% जास्त आहे ती स्वीकारण्यात यावी अशी विनंती आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१४५२:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज सीए-६६ साठी मेसर्स जॅक्सन लिमिटेड यांचा रु.६३,३८,११,१२२.२९ (त्रेसष्ठ कोटी अडतीस लाख अकरा हजार एकशे बावीस व एकोणतीस पैसे मात्र) (कर वगळता) रक्कमेचा लघुत्तम देकार स्विकारण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यकती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ५:</u>** **<u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल : दिनांक ०१ जानेवारी, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२३</u>**

५.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक १ जानेवारी, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची कार्यकारी समितीस संक्षिप्त माहिती दिली.

५.२ त्यानंतर कार्यकारी समितीने दिनांक १ जानेवारी, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*******